# University of Mumbai

## परिपत्रक

**No. AEM/(2026-27) /2007 /of 2026**

सर्व प्राचार्य/संचालक/संलग्नित, स्वायत्त, अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, इत्यादी महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदवी संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य/संचालक स्वायत्त महाविद्यालये व संस्था, उपपरिसर (ठाणे, कल्याण व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेश पूर्व नोंदणी लिंक (Pre- Registration) दिनांक १३ एप्रिल, २०२६ पासून सुरु करण्यात येत आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रवेशपूर्व नावनोंदणी खालीलप्रमाणे दोन भागात करण्यात येईल -

| | भाग १<br>**Pre-Registration** | भाग २<br>**Application** |
|---|---|---|
| पदवी अभ्यासक्रम | १२ वी निकाल जाहीर होण्यापूर्वी | १२ वी निकाल जाहीर झाल्यानंतर |

विद्यार्थ्यांना नावनोंदणी अर्ज भरण्यासाठी स्वतःचे Registration करावे लागेल Registration करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःची माहिती भरून पूर्ण झाल्यानंतर त्यांचे Login तयार होते. या Login मध्ये विद्यार्थ्यांचे Profile तयार होईल ते Profile पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यामध्ये स्वतःची माहिती, नाव,पत्ता, ABC ID, शैक्षणिक अर्हता, आरक्षण, फोटो, सही आणि संपर्क क्रमांक ही माहिती भरावी लागेल.

पदवी (U.G. degree) अभ्यासक्रमास प्रवेशपूर्व नोंदणी मध्ये विद्यार्थ्यांस कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आहे त्याची नोंद करणे आवश्यक आहे. प्रवेश पुर्व नोंदणी करीता ABC ID आवश्यक आहे. प्रवेशासाठी नोंदणी करू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना आपला ABC ID www.abc.gov.in या लिंक वर जाऊन तयार करून घ्यावा.

प्रवेश पुर्व नोंदणीची लिंक संकेत स्थळावर Admission या शिर्षकाखाली विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे : https://muugadmission.samarth.edu.in/

ykaundale

(डॉ. पुजा रौंदळे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

ठिकाण : मुंबई - ४०००९८
दिनांक : १३ एप्रिल, २०२६